

# पुराणमूर्ती

संदर्भ :- भारतीय संस्कृति कोश, पाचवा खंड पान नं. ६२६, (पं. महादेवशास्त्री जोशी)

पुराणं चम्पकाभासं शुकवक्त्रंच तुन्दिलम् ।
अक्षसूत्राभयं ज्ञेयं नानाभरणभूषितम् ॥

# म नो ग त

अनेक दिवसांपासून पुराणकथांविषयी उत्सुकता वाटत होती. त्या कथां मधून खरेच नेमके काय सूचवायचे आहे ? असा सतत प्रश्न पडत असे. त्यातच दूरदर्शनवरील रामायण व महाभारत या मालिका पाहिल्या गेल्या. व मनातील विचार अधिकच सतावू लागले. रामायण महाभारत बघताना त्यातील कित्येक गोष्टी मनाला पटत नव्हत्या. त्यांचे स्पष्टीकरण शोधण्याचा मन प्रयत्न करू लागले. त्यातच गुरूवर्य डॉ. साळुंखे यांची गाठ पडली . त्यांनी याच विषयावर एम्.फिल्. ची प्रबंधिका सादर करण्यास सूचविले.

ही एम्. फिल्. ची प्रबंधिका सादर करण्यासाठी पुराणकथांतील नीतिमूल्ये असा विषय घेतला. अर्थात् कित्येकांनी हा विषय व त्याचा आवाका फारच प्रचंड आहे त्यामुळे तो स्वीकारू नये असाही सल्ला दिला. व खरेच जेव्हा अभ्यासास प्रारंभ केला तेव्हा त्याचा प्रचंड आवाका बघून मन ही अवाक झाले. पुराणकथेत केवळ मानवेतिहास वा काल्पनिक कहाणी आढळत नाही तर अचेतन अशा ग्रह नक्षत्रांनाही मानवी भावनांचे चेतनयुक्त रूप देऊन यापैकी काही कथा नटलेल्या आहेत. अशा या कथा माणसांना सत्कर्मांचे ठायी प्रवृत्त करतात तर कधी कधी दुष्कर्मापासून माणसाला विरक्त करतात. किंबहुना जड व अचेतन सृष्टी सचेतन होऊन माणसांप्रमाणेच माणसाच्या पुढे ठाकते हेच या कथांचे वैशिष्टय पुनः पुनः याच विषयांवर विचारप्रवण करू लागले व डॉ. आ. ह. साळुंखे यांनी विषयाच्या बाबतीत नेमके मार्गदर्शन केले. या प्रबंधिकेत पुराणकथा व त्यांचे स्वरूप , नीतिमूल्ये व त्यांचे स्वरूप व पुराणकथा व नीतिमूल्ये यांचे संबंध यावर अभ्यास करुन विविध पुराणकथांच्या आधारे त्यातील नीतिमूल्यांची चिकित्सा केलेली आहे.

डॉ. आ. ह. साळुंखे यांच सतत मार्गदर्शन लाभले तसेच सौ. साळुंखे यांचे सततचे प्रोत्साहन फारच उपयुक्त ठरले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. तारा भवाळकर यांनीही बहुमोल मार्गदर्शन करुन सहकार्य केले.

बाईच्या विश्वकोशातील ग्रंथपाल श्री नायगावकर, श्रीमती कोल्हटकर, धर्मकोशाच्या ग्रंथपाल श्रीमती नानजकर यांनी अनेक प्रकारे मदत केली.

भांडारकर इन्स्टिटयूटचे ग्रंथपाल श्री मंजूळ व त्यांचे सर्व सहकारी यांचे सर्व त-हेचे सहकार्य मला लाभले.

सद्‌गुरूगाडगे महाराज कॉलेज क-हाडचे ग्रंथपाल श्री भोसले, प्रा.डॉ.कुंदप, क-हाड नगरवाचनालय क-हाड चे निवृत्त ग्रंथपाल श्री पाटील, तसेच सध्याचे ग्रंथपाल श्री आदमणे व त्यांचे सर्व सहकारी यांनी मला विविध प्रकारे सहकार्य केले. टिळक हायस्कूल क-हाड ग्रंथपाल श्री पोतदार यांनीही बहुमोल सहकार्य केले.

टिळक हायस्कूल क-हाडचे निवृत्त मुख्याध्यापक डॉ. प्रभुणे यांचे सतत प्रोत्साहन लाभले. लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य अमरसिंह राणे, टिळक हायस्कूलचे सर्व अध्यापक सहकारी व अन्य कार्यकर्ते, महिला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री डिसूझा यांनीही अनेक प्रकारे सहकार्य केले. माझे पती श्री किशोर काळे, माझ्या मुली चि. शिल्पा व चि. कीर्ती यांच्या सतत मिळणा-या प्रोत्साहनामुळे व सहकार्यामुळे माझ्या हातून हे लेखन पूर्ण झाले.

वरील सर्व संस्था व सहकार्य करणा-या व्यक्ती यांची मी मन:पूर्वक आभारी आहे.

**सौ. स्मिता किशोर काळे**